


या व्हिडिओमध्ये तुम्ही उषा जानोम गॅदरिंग फुट वापरुन फॅशनेबल गळपट्टा तयार करणे शिकणार आहात.



तुम्ही तुमचा जुना दुपट्टा किंवा गळपट्टा सुद्धा निवडू शकता आणि त्याला सुंदर शैलीमध्ये रुपांतरीत करू शकता. गॅदरिंग फुट कसे वापरायचे हे जाणून घेण्यासाठी आमची गॅदरिंग फुट शिकवणी जर पाहिली नसेल, तर इथे पाहू शकता. जर तुम्हाला मूळ शिवण कशी करायची हे माहित असेल तर तुम्ही तेसुद्धा करू शकता. तुम्हाला आवश्यकता आहे एका उषा जानोम गॅदरिंग फुटची, एक कपड्याचा तुकडा ज्याचे माप 140 X 15 इंच असेल किंवा एक आधीचा गळपट्टा, काही दोरे, एक फुटपट्टी आणि एक मार्कर. तुमची इच्छा असल्यास तुम्ही जुना दुपट्टा देखील वापरू शकता आणि त्याच्या लांबीच्या समांतर त्याला कापू शकता. आणि हो, तुम्ही जर हे करत असाल तर कापलेले काठ तुम्हाला शिवून घ्यावे लागतील. आणि कापड खूप जाड किंवा वजनदार नसल्याची खात्री करून घ्या. नागमोडी दुमडण्याच्या पद्धतीने कापड कसे जोडले जाते ते पहा. आता दुमडलेल्या कपड्याच्या तुकड्यावर मी सुरुवातीच्या काठापासून दर 3 इंचानंतर खुणा कशा करत आहे हे पहा. त्यांच्या दरम्यान 3 इंच जागा ठेवून सारख्या खुणा करण्यासाठी दुमडींना वर हलवा. कापड उघडणे चालू ठेवा आणि शेवटच्या टोकाला पोहोचेपर्यंत असे करत राहा. आता अशाप्रकारे फुटपट्टीच्या साह्याने कपड्याच्या लांबीच्या समांतर खुणा जोडा.



सर्व खुणांसाठी असेच करा.
वर पासून खाल पर्यंत 4 उभ्या रेषा तयार होईपर्यंत असेच करत राहा. ह्या त्याच रेषा आहेत ज्यांच्या वरून आपण गॅदरिंग फूटच्या मदतीने शिवणार आहोत. सुरु करण्यासाठी सर्वात आधी आपल्याला साधारण प्रेशर फुटला गॅदरिंग फुट ने बदलावे लागेल.









अशाप्रकारे साधारण प्रेशर फुटचा पेच काढा, प्रेशर वर उचला आणि फुट काढा. गॅदरिंग फुट घ्या, ते पेचाच्या मदतीने समांतर करा, दाबून ठेवा आणि पेचाच्या साह्याने व्यवस्थित लावा. आपले कापड मशीन वर घ्या. आता मशीनची सेटिंग व्यवस्थित करा- स्टीच पॅटर्न सेलेक्टरला ‘ए’ वर फिरवा. स्टीच लेंथला कमाल करा आणि थ्रेड टेन्शनला 5 वर सेट करा.



चिन्हांकित रेषेवरून काळजीपूर्वक शिवणकाम सुरु करा. शिवताना नरम गॅदर्स तयार होताना पहा. शेवट पर्यंत शिवत राहा. सुई वर कर करा आणि दोरा कापा. पुढच्या ओळीत शिवणे सुरु करा. चिन्हांकित रेषांवरून गॅदर्सच्या चार ओळी तयार होईपर्यंत प्रक्रिया पुन्हा करा.





सुंदर गॅदर्सच्या थरांपासून बनलेला तुमचा गळपट्टा मिरवण्यास सज्ज आहे. पुढे तुम्ही काठांना हाताने शिवून गुच्छे लावून सजवू शकता. फॅशन सहायक म्हणून गळपट्टे कधीही दुर्लक्षित होत नाहीत – त्यांच्यात तुमचा पेहराव बनवण्याची किंवा उठून दिसण्याची शक्ती असते. ते कोणत्याही पेहरावाला अंतिम रूप देण्यास मदत करतात आणि कोणत्याही ड्रेसेस, कोट, स्वेटर्स, जॅकेट्स आणि सूट सोबत परिधान केले जाऊ शकतात.

